**मटा अँकर** 'हरित इमारत परिषदे'कडून मिरा-भाईंदर महापालिकेला प्रमाणपत्र

# विपश्यना केंद्र ठरले पहिली 'हरित वास्तू'

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये महापालिकेमार्फत मोठे विपश्यना केंद्र उभारण्यात आले आहे. या इमारतीची निर्मिती पर्यावरणस्नेही गोष्टींचा विचार करून करण्यात आली आहे. या इमारतीला आता 'भारतीय हरित इमारत परिषदे'कडून हरित वस्तू म्हणून मान्यता देण्यात आली असून याबाबतचे प्रमाणपत्र नुकतेच पालिकेला अदा करण्यात आले आहे. त्यामुळे विपश्यना केंद्राची इमारत ही शहरातील पहिलीच 'हरित वास्तू' ठरली आहे.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीत नागरिकांना विपश्यनेसाठी चांगली सुविधा उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून मिरा रोडच्या रामदेव पार्क परिसरात विपश्यना केंद्राची सहा हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या जागेत तळ अधिक एकमजली इमारत उभारण्यात आली आहे. सरकारच्या 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत चांगली कामगिरी करण्याच्या उद्देशाने पर्यावरणस्नेही गोष्टींचा विचार करून या इमारतीची उभारणी करण्यात आली आहे. प्रदूषण कमी करणे, पाणी आणि ऊर्जेची बचत करणे इत्यादी गोष्टींना प्राधान्य देण्यात आले आहे. येथील ४३ टक्के क्षेत्रात भारतीय प्रजातींची झाडे लावण्यात आली आहेत. पाण्याच्या बचतीसाठी विशिष्ट पद्धतीचे नळ व इतर उपकरणे बसवण्यात आली आहेत. ऊर्जेचा अधिक वापर टाळण्यासाठी इमारतीच्या छप्परासाठी इन्सुलेटिंग सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यासह काचेचा वापर करून नैसर्गिक प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करून, भारतीय हरित इमारत परिषदेने विपश्यना केंद्राच्या इमारतीला 'हरित इमारत' म्हणून जाहीर केले आहे. तसे प्रमाणपत्र नुकतेच पालिका प्रशासनाला अदा करण्यात आले आहे. यापूर्वी शहरात हरित वास्तूंची निर्मिती करण्यात आलेली नाही. त्यामुळे विपश्यना केंद्र ही शहरातील पहिली 'हरित वास्तू' ठरली आहे. आगामी काळात पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने 'हरित इमारती' उभारण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून भर दिला जाणार असल्याची माहिती आयुक्त दिलीप ढोले यांनी दिली.



### अशी आहे हरित इमारत

- ४३ टक्के क्षेत्रात भारतीय प्रजातींची झाडे
- पाणीबचतीसाठी विशिष्ट पद्धतीचे नळ व इतर उपकरणे
- ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी इमारतीच्या छप्परासाठी इन्सुलेटिंग सामग्री
- काचेचा वापर करून नैसर्गिक प्रकाशाची व्यवस्था